आयडॉल ऑफ महाराष्ट्र



# श्री. श्रीमंत तांदुळकर आणि श्री. शिवराम थोरवे

**मैत्रीचं विश्वसनीय नाव**

इतिहास लिखने के लिए कलम नही, हौसलो की जरुरत होती हैं। हे विधान सत्यात उतरवून दाखवलं ते टी अँड टी कंपनीचे सर्वेसर्वा श्री. श्रीमंत तांदुळकर आणि श्री. शिवराम थोरवे या दोन मित्रांनी. ते दोघे मित्र पुण्याच्या मनोजा स्थापत्य यांच्या कंपनीत नाशिकच्या प्रोजेक्टवर अभियंता म्हणून नोकरीला होते. तेथेच त्यांची ओळख झाली. त्या ओळखीचं रूपांतर मैत्रीत व व्यावसायिक भागीदारीत झालं. नोकरी करत असतानाच त्यांनी एक निर्णय घेतला की आपल्याला स्वतःचा व्यवसाय उभारायचा आहे व त्या व्यवसाय उभारणीसाठी त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले.

## वडगावकर सरांशी जिव्हाळा

**माळीनगरच्या शाळेत असताना श्रीमंत तांदुळकर यांना वडगावकर सर म्हणून एक शिक्षक होते. त्यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या प्रत्येक अडचणीत सर त्यांना मदत करत. इतकेच नव्हे तर शाळेच्या सुट्टीत ते त्यांना पत्रदेखील लिहीत.**

एक पेन चूक करू शकतो. पण एक पेन्सिल कधीच चूक करत नाही, कारण तिचा पार्टनर (खोडरबर) तिच्या सोबत असतो, तो तिच्या सर्व चुका सुधारतो, म्हणूनच जीवनात आपला एक तरी विश्वासू मित्र असावा, जो आपल्या चुका सुधारेल. हे विधान श्री. श्रीमंत तांदुळकर आणि श्री. शिवराम थोरवे यांच्या बाबतीत तंतोतंत खरं ठरतं कारण आजपर्यंत दोघांनी अगदी विश्वासपूर्ण मैत्री जोपासली आहे.

श्री. श्रीमंत तांदुळकर आणि श्री. शिवराम थोरवे यांच्या विश्वासपूर्ण मैत्रीचं फलित म्हणजे टी आणि टी ग्रुप आहे. ब्रिज कन्स्ट्रक्शन ही आवड असली तरी, संबंधित आनुषंगिक उपक्रमांसह या क्षेत्रात कंपनी सर्व प्रकारचे पूल बांधण्यात अग्रेसर आहे आणि यशाची कोनशिला म्हणजे ग्राहकांच्या समाधानावर पूर्ण लक्ष केंद्रित करणं, त्यांना उत्कृष्ट समाधान, अतुलनीय गुणवत्ता आणि प्रकल्प वेळेवर पूर्ण करणं हे या कंपनीचं वैशिष्ट्य आहे. कंपनीकडे पूर्णतः स्वयंचलित आणि प्रगत यंत्रसामग्री आणि सर्वोच्च तंत्रज्ञानासह उपकरणं असलेली समृद्ध पायाभूत संरचना आहे. कंपनीकडे आवश्यक तांत्रिक आणि व्यवस्थापकीय कौशल्यं असलेल्या व्यावसायिकांचा समूह आहे. म्हणूनच संपूर्ण महाराष्ट्रात ब्रिज कन्स्ट्रक्शनसाठी एक विश्वसनीय नाव म्हणून टी आणि टी ग्रुपचा नावलौकिक आहे. टी आणि टी ग्रुपचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी या पदांवर असलेल्या श्री. श्रीमंत तांदुळकर आणि श्री. शिवराम थोरवे यांच्या मैत्रीच्या व कंपनीच्या यशस्वी वाटचालीचा आलेख पुढीलप्रमाणे आहे....

### श्री. श्रीमंत तांदुळकर

श्री. श्रीमंत तांदुळकर यांचा जन्म ३१ ऑगस्ट, १९६४ रोजी सोलापूर जिल्ह्यातील शेवरे ता. माढा येथे एका शेतकरी कुटुंबात झाला. ते एकूण तीन भावंडं. त्यांचं सातवी पर्यंतचं शिक्षण जिल्हा परिषद शाळेत झालं. हायस्कुलचं शिक्षण माळीनगर व टेक्निकल शिक्षण बार्शी येथे झालं. त्यांनी १९८६ मध्ये नाशिक येथून शासकीय पॉलिटेक्निक कॉलेजमधून डिप्लोमा केला. नाशिकला असताना त्यांनी हॉस्टेल जीवनाचा अनुभव घेतला. मध्यमवर्गीय कुटुंबातील असल्यामुळे त्यांना होस्टेलला असताना फारशा अडचणी आल्या नाहीत. अगदी सहजपणे त्यांनी हॉस्टेलमध्ये सर्वांशी जुळवून घेतलं.

शाळेत पहिल्या सहामध्ये त्यांचा समावेश असे. आईची इच्छा व शिक्षकांचे संस्कार यामुळेच आपण आज इथपर्यंत पोहोचू शकलो, असं ते आवर्जून सांगतात. त्यांनी नाशिक येथील मनोजा स्थापत्य यांच्याकडे पहिली नोकरी


© Copyright T and T Infra
Limited 2022. All rights reserved.


© Copyright T and T Infra
Limited 2022. All rights reserved.


pyright T and T Infra Limited
All rights reserved.




© Copyright T and T Infra
Limited 2022. All rights reserved.

## व्यवस्थापक, संचालक व कर्मचारी यांच्यातील विश्वासाचं नातं

**कंपनीत कंट्रोलिंग व नियोजनात्मक कामावर अधिक भर दिला जातो. त्यामुळे प्रामाणिकपणे काम करणारी माणसं कंपनीशी जोडली गेली. कोणत्याही कर्मचाऱ्याला अडचण असल्यास स्वतः मालकांशी बोलण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यामुळे एवढी मोठी उलाढाल व विविध ठिकाणी असलेल्या प्रकल्पावर कधीही कोणताही गैरप्रकार होत नाही व होणारही नाही, एवढा विश्वास कंपनीचे व्यवस्थापक, संचालक व कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाला आहे, असे श्री. तांदुळकर व श्री. थोरवे अभिमानानं सांगतात.**

केली. नाशिक येथील पंचवटी ब्रिजचं काम त्यांनी केलं. या कंपनीत ते तीन वर्षं होते. त्यांनतर ते पुण्यात आले. पुणे महानगरपालिकेअंतर्गत वाकडेवाडी भुयारी मार्गाच्या कामावर ते मनोजा स्थापत्यकडून प्रकल्प प्रभारी म्हणून रुजू झाले. त्यांच्या वडिलांचे मित्र यादव साहेबांनी त्यांना स्वतःचा व्यवसाय करण्याचा सल्ला दिला. खरं तर त्यांची पण तीच इच्छा होती परंतु प्रश्न होता तो भांडवलाचा. कारण इच्छा असली तरी व्यवसाय उभारणीसाठी आर्थिक बळ नव्हतं. म्हणतात ना इच्छा तेथे मार्ग असंच त्यांच्या बाबतीतही घडलं. १९९२ मध्ये पुण्यातील बीएसएनएल केबलचं डक्ट खोदण्याच्या कामाविषयी त्यांना एका अधिकाऱ्यानं विचारलं. संधी स्वतः चालून आली आहे याचा त्यांना आनंद झाला. काम जरी फक्त पंचवीस हजारांचं असलं तरी त्यांच्या स्वतःच्या कामाची सुरुवात आता झाली होती. ते दिवसभर नोकरी करत व रात्री बीएसएनएल केबलच्या डक्टचं काम करत. नियोजित वेळेच्या आतच त्यांनी गुणवत्तापूर्ण काम करून दिलं.

पंढरपूर जवळ एका प्रकल्पावर काम करत असताना त्यांची व श्री. थोरवे यांची ओळख झाली. ते सुद्धा मनोजा स्थापत्य यांच्या कंपनीत नोकरीला होते. दोघंही एकाच कंपनीत होते. समवयस्क, सारखी विचारसरणी व सारखी कौटुंबिक पार्श्वभूमी असल्यामुळे लवकरच त्यांची गट्टी जमली व मैत्रीचे सूर जुळले, जे आजतागायत शाबूत आहेत. मनोजा स्थापत्य येथील नोकरी सोडताना त्यांना चार हजार तीनशे रुपये महिना पगार मिळत होता.

आता त्यांना छोटी छोटी कामं मिळू लागली होती. त्यामुळे हातात पैसे होते. स्वतःचा व्यवसाय करायचा हा निश्चय करून त्यांनी १ जानेवारी, १९९४ ला नोकरीचा राजीनामा दिला व पूर्णपणे व्यवसायात काम सुरू केले. त्यांच्या या प्रवासात त्यांच्या पत्नी सौ. शोभा यांची त्यांना मोलाची साथ लाभली. त्यांना दोन मुली आहेत. त्यांच्या थोरल्या मुलीने कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीतून इलेक्ट्रॉनिक्समध्ये पदवी घेतली आहे, व धाकट्या मुलीने वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीतून कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट विषयात पदवी घेतली आहे. त्या दोघीही वडिलांच्या व्यवसायात सहभागी झाल्या आहेत.

त्यांनी व थोरवे यांनी मिळून छोटी–मोठी कामं घ्यायला सुरुवात केली. पुण्यातील औंधच्या ब्रीजचं काम चालू होतं, त्या वेळी त्यांना नाडकर्णी म्हणून एक गृहस्थ भेटले. मुळशीला एक छोटा ब्रिज बांधायचा आहे, त्यासाठी त्यांना कॉन्ट्रॅक्टर पाहिजे होता. नाडकर्णींच्या वतीने त्यांना मुळशीचा छोटा ब्रिज बांधण्याचं काम मिळालं व येथूनच त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीची खरी सुरुवात झाली.







### श्री. शिवराम थोरवे

श्री. शिवराम भिकाजी थोरवे यांचा जन्म २५ फेब्रुवारी, १९६४ रोजी झाला. ते मूळचे सातारा जिल्ह्यातील वाई तालुक्यातील व्याहळी (पु.) गावचे. त्यांचं शालेय शिक्षण पाचवड या ठिकाणी झालं. त्यांनी सातारच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातून सिव्हील इंजिनीअरिंग पदवीचं शिक्षण घेतलं. १९८९ मध्ये ते पुण्याच्या मनोजा स्थापत्यकडे फ्रेशर्स म्हणून नोकरीला लागले. श्री. तांदुळकर औंधच्या प्रकल्पावर प्रकल्प प्रभारी म्हणून होते, तर श्री. थोरवे हे डिंबे डॅमच्या पॉवरहाऊसच्या प्रकल्पावर होते. दोघंही पुण्यात भेटायचे. येथूनच मैत्रीचे सूर जुळताजुळता व्यावसायिक वातावरणाची देखील निर्मिती झाली. कारण दोघांनाही स्वतःचा व्यवसाय करण्याची जिद्द होती. म्हणून दोघांनी मिळून व्यवसाय करायच ठरवलं. दोघांनी थोडे-थोडे पैसे भांडवल म्हणून उभारले व छोट्या छोट्या कामांपासून आपल्या व्यावसायिक वाटचालीची सुरुवात केली. त्यांच्या या वाटचालीत त्यांची पत्नी सौ. अनिता यांनी मोलाची साथ दिली. वडीलधाऱ्यांच्या पसंतीस मान देऊन ते सौ. अनिता यांच्याशी विवाहबद्ध झाले. मात्र वडीलधाऱ्यांची पसंती खरोखरच त्यांच्यासाठी अनुरूप ठरली असं ते अभिमानानं सांगतात. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. त्यांची मुलगी सौ. श्वेता कुंजीर या श्री. सौरभ कुंजीर यांच्या पत्नी आहेत. त्यांचा मुलगा अभिषेक यांनी न्यूझिलँड युनिव्हर्सिटीतून पदवी घेतली आहे. तो आज वडिलांच्या व्यवसायात बरोबरीने सहभागी झाला आहे.

### टी अँड टी ग्रुपची यशस्वी वाटचाल

मेहनत करून स्वतःला सिद्ध करून दाखवू शकतो तसंच आपल्यातील स्कील दाखवून आपण यशस्वी होऊन दाखवू शकतो, हे विधान त्यांनी सत्यात उतरवलं. १९९४ पासून त्यांनी व्यवसायास सुरुवात केली. मुळशीचा ब्रिज बांधायचं पहिलं काम त्यांना मिळालं होतं. ते आठ लाखांचं काम होतं जे त्यांनी केवळ चार महिन्यांत पूर्ण केलं. त्या कामात त्यांचं क्वालिफिकेशन बनलं. त्या प्रकल्पावर श्री. एम. व्ही. पाटील हे चीफ इंजिनीअर होते. त्यांनी त्यांचं गुणवत्तापूर्ण काम पाहून त्यांना विशेष पंधरा लाखांचं लायसन्स दिलं. त्यांच्या उत्तम शेऱ्यामुळे परवाना लवकर मिळाला. ज्यामुळे भोर, मुळशी, वेल्हा, मावळ इत्यादी ठिकाणी छोटे-छोटे साकव (साकव म्हणजे लहान ओढ्यावरचा पूल) बांधण्याची कामं मिळाली.

१९९६ साली ताम्हिणी घाटात सार्वजनिक बांधकाम विभाग अंतर्गत ब्रिज बांधला. त्यांनतर राष्ट्रीय महामार्ग सोलापूर रोड भिगवणपर्यंत रस्ता रुंदीकरणाचं काम केलं. छोटी-मोठी कामं सातत्याने चालू होती. २००१ ला जळगावला अनेर

श्री. श्रीमंत तांदुळकर सांगतात, ''माझ्या गावी अति उच्च तंत्रज्ञान वापरून अगदी माझ्या शेतातच मोठ्या पुलाचं काम झालेलं आहे. साधारण १९७६ ते १९८४ दरम्यान एक किलोमीटर ब्रिजचं काम झालं. या कामातून मला प्रोत्साहन मिळालं.''



नदीवर पूल बांधला. ते काम पंच्याहत्तर लाखांचं होत. त्यात क्वालिफिकेशन बनलं आणि विशेष म्हणजे त्यांच्या डिझाईनसह टेंडर भरण्याचं प्रमाणपत्र त्यांना मिळालं. त्यानंतर त्यांनी स्वतःचं डिझाईन असलेलं टेंडर भरण्यास सुरुवात केली.

२००६ ला राहू जि. पुणे येथे पूल बांधण्याचं काम मिळालं. हे टेंडर तीन-सव्वातीन कोटींचं होतं. या कामात त्यांना चांगले पैसे मिळाले. सार्वजनिक बांधकाम विभागातून खूप कामं मिळत होती, मात्र अडचण अशी होती की बिल लवकर पास होत नव्हतं. तेव्हा त्यांनी स्वखर्चानेदेखील कामं पूर्ण केली. त्यांना एचडीएफसी, बँक ऑफ इंडिया, ॲक्सिस बँक, आयसीआयसीआय बँक या बँकांनी आर्थिक साहाय्य केलं.

२००६ पासून त्यांच्या कंपनीची घोडदौड जोमात सुरू झाली. आता टी अँड टी ग्रुपचं नाव झालं होतं. वेळेत आणि गुणवत्तापूर्ण काम यासाठी टी अँड टी ग्रुप प्रसिद्ध झाला होता. त्यामुळं मोठंमोठी कामं मिळायला लागली होती. ऑक्सफर्ड गोल्फमध्ये शेवलेकर बिल्डर यांना जलद रस्ता बंधून पाहिजे होता. त्यांनी तो रस्ता केवळ नव्वद दिवसांत बांधून दिला. त्यासाठी त्यांनी तीन शिफ्टमध्ये काम केलं. या कामात देखील त्यांचं क्वालिफिकेशन बनलं. त्यामुळं पुढे आणखी कामं मिळत गेली.

त्यांनी २००८ मध्ये पुण्यातील बंडगार्डन व त्या शेजारील पूल बांधला. या पुलाचं वैशिष्ट्यं म्हणजे यात विशेषतः ५४ मीटरचं आर्चेस होतं. या क्वालिफिकेशनवर त्यांना पुण्यातील सांगवी येथे साई चौक व डांगे चौकातील उड्डाणपुलाचं काम मिळालं. त्यानंतर कंपनीला महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ तथा एमएसआरडीसीकडून पुण्यातील देहू येथील उड्डाणपुलाचं काम मिळालं. त्यानंतर कल्याणजवळ दुर्गाडी ब्रिजचं काम मिळालं. ते टेंडर एकशेदहा कोटींचं होतं. राजगुरूनगर बायपास व मंचर बायपास रोडचं दोनशे कोटींचं काम मिळालं.




महाडचा ब्रिज कोसळला तेव्हा गडकरी यांच्याकडे भूपृष्ठ वाहतूक व जहाज या मंत्रालयाचा कार्यभार होता. त्यांनी सहा महिन्यांत पूल बांधून देण्याचं आव्हान दिलं. या कामाचं टेंडर भरणं हे आव्हानात्मक होतं, कारण एवढं मोठं काम व केवळ सहा महिन्यांत पूर्ण करायचं होतं. त्यांनी ते टेंडर भरलं व केवळ एकशे पासष्ट दिवसांत सावित्री नदीवर पूल तयार करून दिला. या कामामुळे कंपनीचं खूपच नाव झालं. टी अँड टी ग्रुप म्हणजे जलद व गुणवत्तापूर्ण कामं हे ब्रीद एकदा पुन्हा सिद्ध झालं.

### केबल स्ट्रीट ब्रिज बांधणारी अग्रणी कंपनी

टी अँड टी ग्रुप ही महाराष्ट्रात केबल स्टेड ब्रिज बांधणारी अग्रणी कंपनी आहे. या कंपनीने सर्वप्रथम चंद्रपूर येथे केबल स्टेड ब्रिज बांधला. नागपूरमध्ये आंबोऱ्यात त्याच धर्तीचा पूल बांधण्याचं काम चालू आहे. दापोडा, नांदेड, केडीएमसी अंतर्गत टिटवाळा, नावडे याठिकाणी उड्डाणपुलाचं काम सुरू आहे. गेल्या पंचवीस वर्षांपासून कंपनीची यशस्वी वाटचाल चालू आहे. आज कंपनीची उलाढाल तीनशेसाठ कोटींची आहे. कंपनीत दोनशे पन्नास इंजिनीअर, दीडशे सुपरवायझर आणि इतर विभागांत कार्यरत कर्मचारी असे एकूण सातशे पन्नास कर्मचारी आहेत. तसेच विविध ठिकाणी सुरू असलेल्या विद्यमान प्रकल्पांवर जवळजवळ दोन हजार कामगार कार्यरत आहेत व प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कामगार मिळून दीड हजार कामगार काम करतात. कंपनीत सर्वाधिक वेतनश्रेणी असलेली पाच ते सहा पदं आहेत. ज्या पदावर अडीच लाख रुपये एवढं वेतन दिलं जातं.

कर्म भूमी की दुनिया में, श्रम सभी को करना है । भगवान सिर्फ लकीरें देता है, रंग हमें ही भरने है..। व्यवसायाच्या वृद्धीसाठी कोणत्याही व्यवसायात नावीन्य व तंत्रज्ञान आत्मसात करणं आवश्यक असतं त्यासाठी श्री. तांदुळकर स्वतः नवीन पिढीतील मुलांना बरोबर घेऊन उत्तराखंडला जाऊन बिझनेस कोचिंग घेऊन आले. त्याठिकाणी विविध व्यवसायांशी संबंधित उद्योजक आले होते. त्यांच्याशी चर्चा करून आपल्या व्यवसायात त्याचा कसा उपयोग करता येईल, याचा आढावा त्यांनी घेतला. याचा फायदा त्यांना आपल्या व्यवसायात करून घेता आला.

### सामाजिक उपक्रम

कंपनीमार्फत कामगारांसाठी विशेष योजना राबविल्या जातात. ज्या अंतर्गत कामगारांना मदत केली जाते. तसेच कंपनीकडून सामाजिक स्तरावर सुवर्ण

बीज ही योजना राबविली जाते. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे गरीब, होतकरू, अनाथ मुलांच्या शिक्षणासाठीचा खर्च कंपनीमार्फत केला जातो. जी मुलं या योजनेअंतर्गत शिक्षण घेतात, त्या मुलांना कंपनीत नोकरी दिली जाते. नोकरीला लागल्यानंतर त्यांच्या पगारातून त्यांच्या शिक्षणासाठी देण्यात आलेली रक्कम परत केली जाते.

### गोपालन व सेंद्रिय शेतीची आवड

श्री. तांदुळकर हे श्री श्री रवीशंकर यांच्या आर्ट ऑफ लिव्हिंगशी जोडलेले आहेत. त्यामुळे कंपनीत कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने गुरुजींचे कोर्सेस व योगावर्गाचे आयोजन केले जाते. त्यांना गोपालनाची आवड आहे, म्हणून त्यांनी आपल्या गावी पंचवीस देशी गाई पाळल्या आहेत. तसेच गो–आधारित सेंद्रिय शेतीदेखील केली जाते.

### व्यावसायिक वाटचालीचा आढावा

८ सप्टेंबर, २०१२ रोजी निगमन प्रमाणपत्राद्वारे प्रायव्हेट लिमिटेड कंपनी म्हणून समावेश करण्यात आला होता. ४ जून, २०१८ रोजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेडमधून पब्लिक लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतरित झाली. पुढे कंपनी ऑटो रन व्हावी या दृष्टीने कंपनीची वाटचाल सुरू आहे. शेअरलिस्टिंगसाठी कंपनीची वाटचाल झाली आहे. यासाठी गावडे अँड कंपनी व मर्चंट बँकेचं सहकार्य त्यांना लाभलं आहे. त्यांना दुर्गाडे ब्रिजच्या गुणवत्तापूर्ण कामासाठी बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियातर्फे स्पेशल प्रोजेक्ट अवॉर्डने सन्मानित करण्यात आलं आहे. तसेच मराठा चेम्बर ऑफ कॉमर्सतर्फे फर्स्ट जनरेशन सक्सेसफुल ॲवॉर्डने गौरविण्यात आलं आहे. याशिवाय विविध प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल वेळोवेळी वेगवेगळ्या पुरस्कारांनी त्यांना पुरस्कृत करण्यात आलं आहे. भविष्यात किफायतशीर स्ट्रक्चरल




डिझाईन्सद्वारे जागतिक दर्जाचे पायाभूत सुविधा प्रदाता बनणं आणि मिशन राष्ट्राला दर्जेदार आणि टिकाऊपणासह सुरक्षित आणि उत्तम पायाभूत सुविधा प्रदान करणं हेच कंपनीचं मुख्य ध्येय आहे.

१९९४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या या कंपनीत नव्या पिढीचं पदार्पण झालं आहे. श्री. तांदुळकर यांच्या दोन्ही सुकन्या व श्री. थोरवे यांचे सुपुत्र या नव्या पिढीने कंपनीत पदार्पण केलं आहे. नव्या पिढीकडूनही कंपनीचा अधिकाधिक विकास व्हावा व अधिकाधिक लोकांना रोजगार उपलब्ध करून देता यावा अशी सर्वांची इच्छा आहे. तसेच जलद व गुणवत्तापूर्ण कामं ही कंपनीची ओळख कायम रहावी. नव्या पिढीने नवीन तंत्रज्ञानचा आविर्भाव करून कंपनीच्या शिरपेचात आणखी चार चाँद लावावेत हीच ईश्वर चरणी प्रार्थना!